लोकमत

## अभिनव देशमुख : शिवाजी विद्यापीठात 'सेवापूर्व'तर्फे व्याख्यान

# प्रेरणेचा स्त्रोत स्वत:मध्येच शोधा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बाहेरच्या जगामधील प्रेरणेचा स्त्रोत कालांतराने ओसरतो. मात्र, तुमच्या स्वयंप्रेरणेचा स्त्रोत नेमका कोणता आहे, हे तुम्ही अंतर्मनाच्या गाभाऱ्यात शोधले की तुम्हाला यशाचा मार्ग सापडतो, असे प्रतिपादन पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने बुधवारी आयोजित व्याख्यानात 'स्पर्धा परीक्षा आणि रोजगार संधी व आव्हाने' विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

ते म्हणाले, स्पर्धा परीक्षा असो अगर कोणती नोकरी, या बाबी केवळ साधन आहेत. अंतिमत: समाजाप्रती, देशाप्रती आपली कर्तव्ये, जबाबदाऱ्या निभावणे, हे खरे साध्य आहे, याचे भान स्पर्धा परीक्षार्थ्यांनी सदैव बाळगावे.



शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख.

घटना-माहिती-ज्ञान-शहाणपण हे चार टप्पे आयुष्यात अत्यंत महत्त्वाचे असतात. एखादी घटना माहिती झाल्यानंतर त्याची कारणमीमांसा करण्याच्या दृष्टीने चिंतन करणार नाही, तोपर्यंत आपल्या विवेचनात सखोलता येणार नाही. त्यामुळे दैनंदिन जीवनातही विश्लेषणक्षमता विकसित

### अखंड मेहनत हवी

स्पर्धा परीक्षांकडे केवळ ग्लॅमर आणि भरपूर पैसा मिळविण्याचे साधन म्हणून कोणी पाहत असेल तर हा तुमचा मार्ग नाही, हे लक्षात घ्या. स्पर्धा परीक्षेनंतरचे आयुष्य हे सन्माननीय मध्यमवर्गाचे आहे आणि इथे तुम्ही समाजाप्रती बांधीलकी निभावण्यासाठी अखंड मेहनत करण्याच्या इराद्याने आणि तयारीनेच आले पाहिजे, असे आवाहनही डॉ. देशमुख यांनी याप्रसंगी केले.

करण्याची सवय लावून घ्यायला हवी.

यावेळी त्यांनी आपला जीवनप्रवास ओघवत्या शब्दांत उलगडला. केंद्राचे समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अमित कांबळे यांनी सूत्रसंचालन केले, तर सचिन कदम यांनी आभार मानले.

# विद्यापीठात आज 'कौशल्य प्रशिक्षण'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज, गुरुवारी सकाळी १०.३० ते सायंकाळी सहा या वेळेत 'असेल तिथे दिसेल त्याला कौशल्य प्रशिक्षण' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राने त्याचे आयोजन केले आहे. विद्यापीठ परिसरात हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती या केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी बुधवारी दिली.



पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेत सांघिक गटात प्रथम क्रमांक पटकावलेला कुरुंदवाड येथील दत्त कनिष्ठ महाविद्यालयाचा संघ.

# 'मोठ्ठा पाऊस आला आणि...' प्रथम

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

कोल्हापूर केंद्रस्तरावर झालेल्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. पुणे येथील महाराष्ट्रीय

**पुरुषोत्तम करंडकचा निकाल जाहीर**

कलोपासक, शिवाजी विद्यापीठ नाट्यशास्त्र विभाग व गायन समाज देवल क्लब यांच्या वतीने २२ ते २४ सप्टेंबर या कालावधीत विद्यापीठातील भाषा भवन येथे ही स्पर्धा झाली.

स्पर्धेत कुरुंदवाड येथील दत्त कनिष्ठ महाविद्यालयाला 'मोठ्ठा पाऊस आला आणि...' या एकांकिकेसाठी सांघिक गटातील प्रथम पारितोषिक मिळाले, तर इस्लामपूर येथील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या 'एक्स्पायरी डेट' या एकांकिकेने द्वितीय क्रमांकाचे बक्षीस पटकावले. सांघिक विभागातील तृतीय क्रमांकाचे बक्षीस इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम महाविद्यालयाला मिळाले.

कोल्हापुरातील भारती विद्यापीठाची भोंडला ही एकांकिका सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ठरली. इचलकरंजीच्या डीकेटीई कॉलेजतर्फे सादर केलेल्या शिकवण या एकांकिकेतील गवत्या या भूमिकेसाठी चैतन्य जवळगेकर याला उत्कृष्ट अभिनेता हा सन्मान मिळाला. राजारामबापू इन्स्टिट्यूटच्या एक्स्पायरी डेट एकांकिकेतील आई या भूमिकेसाठी प्रणाली पाटील हिला उत्कृष्ट अभिनेत्रीचे बक्षीस मिळाले. सर्वोत्कृष्ट लेखकाचे पारितोषिक विवेकानंद कॉलेजच्या तिलांजली या एकांकिकेसाठी सुदर्शन खोत याला मिळाले. अभिनेते आनंद काळे व मेघा पानसरे यांच्याहस्ते विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.

# प्रवेश सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील



बायोकेमिस्ट्री विभागात सुरू करण्यात आलेल्या एमएस्सी इन मेडिकल इन्फर्मेशन मॅनेजमेंट या अभ्यासक्रमासाठी ३० सप्टेंबरपर्यंत प्रवेश अर्ज भरण्याची मुदत आहे. ३ ऑक्टोबर रोजी पहिली यादी जाहीर करण्यात येणार आहे. ५ ऑक्टोबर रोजी ऑनलाइन प्रवेश परीक्षा घेण्यात येणार असून ७ ऑक्टोबर रोजी गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येणार आहे. १४ ऑक्टोबर रोजी प्रवेश निश्चित करण्यासाठी विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले आहे.

पुढारी

# स्वत:मध्येच प्रेरणास्त्रोत शोधा

## डॉ. अभिनव देशमुख यांचे प्रतिपादन; शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वतःच्या प्रेरणेचा स्त्रोत बाहेर नव्हे, तर तुमच्या आतमध्ये शोधा, तेव्हाच खऱ्या अर्थाने जीवनात यशस्वी होण्याची गुरूकिल्ली तुमच्या हाती येईल, असे प्रतिपादन पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी मंगळवारी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने आयोजित 'स्पर्धा परीक्षा आणि रोजगार संधी व आव्हाने' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. देशमुख म्हणाले, स्पर्धापरीक्षा हेच केवळ जीवन नाही, त्यापलीकडेही खूप मोठे जग आहे. त्याचा विचार सातत्याने असला पाहिजे. स्पर्धा परीक्षा असो, अगर कोणतीही नोकरी,



या बाबी केवळ साधन आहेत. अंतिमतः आपल्या समाजाप्रती, देशाप्रती आपली कर्तव्ये, जबाबदाऱ्या निभावणे हे खरे साध्य आहे. वशिलेबाजीविना आणि पारदर्शक पद्धतीने केवळ गुणवत्तेच्या बळावर उमेदवाराची निवड करणाऱ्या यूपीएससीसारख्या यंत्रणेवर परीक्षार्थींचा विश्वास असतो आणि म्हणूनच तिकडे त्यांचा कल असतो. त्यामुळे तयारी करतानाही गुणवत्ता संवर्धनावरच भर देण्याची गरज आहे.

स्पर्धा परीक्षांकडे केवळ ग्लॅमर आणि भरपूर पैसा मिळविण्याचे साधन म्हणून जर कोणी पाहात असेल तर कृपया हा तुमचा मार्ग नाही, हे लक्षात घ्या. स्पर्धा परीक्षेनंतरचे आयुष्य हे सन्माननीय मध्यमवर्गाचे आहे आणि इथे तुम्ही समाजाप्रती बांधिलकी निभावण्यासाठी अथक आणि अखंड मेहनत करण्याच्या इराद्याने आणि तयारीनेच आले पाहिजे, असे आवाहनही डॉ. देशमुख यांनी केले.

यावेळी त्यांना आपल्या एम.बी.बी.एस. डॉक्टर होण्यापासून ते यूपीएससी उत्तीर्ण होण्यापर्यंतचा प्रवासही अतिशय ओघवत्या शब्दांत उलगडला. केंद्राचे समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अमित कांबळे यांनी सूत्रसंचालन केले, तर सचिन कदम यांनी आभार मानले.

# आज मध्यवर्ती युवा महोत्सवाला प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवाला गुरुवारी (दि.२६) प्रारंभ होत आहे. फलटण (जि. सातारा) येथील मुधोजी महाविद्यालयात तीन दिवस हा महोत्सव रंगणार आहे. गुरुवारी समूहगीत, सुगम गायन, लोककला, लघुनाटिका, नकला, एकपात्री, मूकनाट्य, वादविवाद, वक्तृत्व, व्यंगचित्र, भित्तीचित्र, मेहंदी, कातरकाम, पथनाट्य, क्रीडांगण आदी प्रकारांचे सादरीकरण होणार आहे.

# विद्यापीठात एम.एस्सी. मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट अभ्यासक्रम सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात यावर्षीपासून एम.एस्सी. इन मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमासाठी ५ ऑक्टोबर रोजी प्रवेश परीक्षा होणार आहे. याकरिता ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया मंगळवारपासून सुरू झाली. दि. ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करता येणार असून, दि. ५ ऑक्टोबर रोजी तंत्रज्ञान विभागाच्या इमारतीतील संगणकशास्त्र विभागात सकाळी ११ वाजता ही परीक्षा होणार आहे. यानंतर दि. ७ ऑक्टोबरपासून या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. इच्छुकांनी बायोकेमिस्ट्री विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# विद्यापीठात आज कौशल्य प्रशिक्षण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात गुरुवारी (दि. २६) दिसेल त्याला, असेल तिथे कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे. विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने हा अभिनव उपक्रम आयोजित केला आहे. स्पर्धेच्या वातावरणात कौशल्य विकासाची आवड निर्माण करून त्याचे महत्त्व अधिकाधिक युवकांना समजावे, त्यातून विविध कौशल्य विकासाचे प्रशिक्षण मिळावे, रोजगाराच्या संधी प्राप्त करता याव्यात, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. विद्यापीठ परिसरात येणारे सर्व विद्यार्थी, पालक, कर्मचारी यांना हे प्रशिक्षण सकाळी १०.३० ते सायंकाळी ६ या वेळेत दिले जाणार असल्याचे केंद्रांचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 SEP 2019
पुण्यनगरी

# विद्यापीठात पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती बुधवारी शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पंडित उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, आयक्यूएसीचे संचालक डॉ. आर. के. कामत, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. जी. एस. कुलकर्णी, अजित कुलकर्णी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 SEP 2019
पुण्यनगरी

# मतदान कालावधीत परीक्षा वेळापत्रकात बदल

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठातील काही अभ्यासक्रमांच्या प्रथम सत्रातील परीक्षा ऑक्टोबर महिन्यात होणार आहेत. मात्र, राज्यातील निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. मतदानाच्या २० ते



२२ या तीन दिवसाच्या कालावधीत परीक्षा होणार नसल्याने या दिवशीच्या परीक्षा नियोजित ▶▶ पान २ वर

# मतदान कालावधीत परीक्षा वेळापत्रकात बदल

**(पान १ वरून)** परीक्षेच्या अखेरीस होणार आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात पहिल्या सत्रातील परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार बी. ए., बी. कॉम. आणि बी. एस्सी., एम. ए., एम. कॉम. आणि एम. एस्सी., बी. व्होक. पदवी, पदविका अभ्यासक्रमांच्या विविध सत्रांच्या एकूण ५९१ परीक्षा आक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान होणार आहेत. मात्र या काळात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. २१ रोजी मतदान, तर २४ रोजी मतमोजणी होणार आहे. या दरम्यान ज्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार होत्या, त्या पुढे ढकलल्या जाणार आहेत. या तीन दिवसातील पेपर परीक्षांच्या अखेरीस घेतले जाणार आहेत. विद्यापीठ आणि परिक्षेत्रातील महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विधानसभा निवडणुकीकरिता मतदान अधिकारी म्हणून निवडणूक आयोगाकडून नियुक्ती केली जाते. त्यामुळे परीक्षा घेणे शक्य नाही. लोकसभा निवडणुकीच्या मतदानाच्या दरम्यान शिवाजी विद्यापीठाच्या तीन दिवसांच्या परीक्षानंतर घेण्यात आल्या होत्या.

# राजा ढालेंच्या जयंतीनिमित्त व्याख्यान

**रमणमळा :** आंबेडकरी विचारवंत, साहित्यिक राजा ढाले यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान, पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. ३० सप्टेंबरला सायंकाळी चार वाजता शाहू स्मारक भवनातील मिनी हॉलमध्ये कार्यक्रम होईल. ज. वि. पवार त्यांच्या कार्याविषयी मार्गदर्शन करतील. प्रा. जी. बी. अंबपकर यांनी लिहिलेले 'आंबेडकरनिस्ट आणि कम्युनिस्ट' या पुस्तकाचे प्रकाशन दलित पँथरचे संस्थापक सदस्य श्री. पवार यांच्या हस्ते होईल.

शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागातील प्रा. डॉ. जगन कराडे, प्रा. डॉ. सर्जेराव पद्माकर मार्गदर्शन करतील. प्राचार्य बापूसाहेब माने अध्यक्षस्थानी असतील. फुले, आंबेडकर अनुयायी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
26 SEP 2019
तरुण भारत



# विद्यापीठ मध्यवर्ती युवामहोत्सव आजपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठअंतर्गत ३९ वा कोल्हापूर जिल्हास्तरीय युवामहोत्सव तिन्ही जिल्ह्यात नुकताच पार पडला. या महोत्सवातील विजेत्यांचा मध्यवर्ती युवा महोत्सव घेण्यात येणार आहे. हा महोत्सव फलटण येथील मुधोजी महाविद्यालयात २६ ते २८ सप्टेंबरदरम्यान होणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते सकाळी ९.३० वाजता होणार आहे, अशी माहिती विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली.

लोकसंगीत वाद्यवृंद, लोककला, लोकनृत्य, लघुनाटिका, मूकनाट्य, नकला, सुगमसंगीत, भारतीय समूहगीत, एकांकिका, सांघिक रचनाकृती अशा विविध कलाप्रकारांचे सादरीकरण होणार आहे. शनिवार २८ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता मध्यवर्ती युवामहोत्सवाचा पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 SEP 2019
तरुण भारत

# 'एनएसएसमुळे विद्यार्थ्यांना प्रगल्भता येते'

**कोल्हापूर :** स्वतंत्र भारतात ५० वर्षापूर्वी स्थापन झालेला राष्ट्रीय सेवा योजना विभाग म्हणजे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी हक्काचे व्यासपीठ निर्माण झाले आहे. जो कोणी या व्यासपीठावर येतो तो कायमचा समाजाचा होतो. या व्यासपीठावरुन प्रगल्भ व्यक्तिमत्व घडून, जीवन गतिशील होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी केले. विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा एस एम रुईकर होते. स्वागत व प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील यांनी केले. प्रा. पी. आर. बागडे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. आदित्य लातूरकर, अनिकेत पाटील, ऐश्वर्या मोरे यांनी आपले विचार मांडले. प्रा डॉ मंजुश्री घोरपडे यांनी आभार मानले. अपूर्वा खांडेकर यांनी सुत्रसंचालन केले. यावेळी प्रा संदीप पाटील, प्रा बी के गावीत, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 SEP 2019
तरुण भारत

# 'एमएस्सी मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट' प्रवेश परीक्षा ५ ऑक्टोबरला

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात 'एमएस्सी मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट" अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ३० सप्टेंबरपर्यंत ३०० रूपये प्रवेशशुल्कासह ऑनलाईन प्रवेशपरीक्षा अर्ज भरावयाचा आहे. अर्जछाननी करून ३ ऑक्टोबर रोजी परीक्षार्थींची नावे जाहीर करण्यात येणार आहेत. शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्र विभाग (तंत्रज्ञान अधिविभागातील) ऑनलाईन परीक्षा केंद्र आहे. या केंद्रावर ५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाईन प्रवेश परीक्षा होणार आहे. ७ ऑक्टोबर रोजी पात्र विद्यार्थ्यांची कच्ची यादी जाहीर करण्यात येणार आहे. यासंदर्भात काही तक्रार असल्यास १० ऑक्टोबरला विभागाकडे तक्रार नोंद करावयाची आहे. त्यानंतर ११ ऑक्टोबरला अंतिम यादी जाहीर होईल. १४ ऑक्टोबरला प्रवेश घ्यावयाचा आहे. तर १५ ऑक्टोबर ला प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचे वर्ग सुरू होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 SEP 2019
तरुण भारत

# शिष्यवृत्तीसंदर्भातील कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृह येथे शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवरून सन २०१९-२०२० या वर्षातील शिष्यवृत्ती ऑनलाईन फॉर्म भरताना येणाऱ्या अडचणीसंदर्भात कार्यशाळेचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते. उच्च शिक्षण सहाय्यक संचालक कार्यालयातील लेखनिक प्रतिभा दिक्षीत यांनी महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्तींसंदर्भात माहिती दिली. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनांचे महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन अर्ज भरताना कोणती कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. भरलेला अर्ज संकेतस्थळावर कसा भरायचा यासंदर्भात माहिती दिली. समाजकल्याण कार्यालयातील सुप्रिया काळे यांनी भारत सरकार शिष्यवृत्तीअंतर्गत आर्थिक निकषावर शिष्यवृत्ती व फ्रिशिप योजनेचे **www.Mahadbtmahait.gov.in** या पोर्टलवर अचूकपणे भरावा अशा सूचना केल्या. वरिष्ठ सहायक रमेश ढोणुक्षे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 SEP 2019
तरूण भारत

# 'पुरुषोत्तम' मध्ये दत्त कनिष्ठ कॉलेज प्रथम

## 'मोठा पाऊस आला' एकांकिकेची बाजी

प्रतिनिधी
कोल्हापूर

पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत कुरूंदवाड येथील दत्त कनिष्ठ महाविद्यालयाने 'मोठा पाऊस आला' या एकांकिकेसाठी सांघिक गटातील प्रथम पारितोषिक पटकावले. इस्लामपूर येथील राजारामबापू इस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या 'एक्स्पायरी डेट'या एकांकिकेने द्वितीय तर इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम आर्टस अँन्ड सायन्स कॉलेजच्या 'गेला शाम्या कुणीकडे' या एकांकिकेला सांघिक विभागातील तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या संघांना अभिनेते आनंद काळे आणि शिवाजी विद्यापीठातील फॉरेन लँग्वेज विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.



**कोल्हापूर : एकांकिका स्पर्धेतील विजेत्यांसोबत अभिनेते आनंद काळे, डॉ. मेघा पानसरे. सोबत राजेंद्र पित्रे, सुबोध गद्रे, उमा नामजोशी.**

पुणे येथील महाराष्ट्रीय कलोपासक, शिवाजी विद्यापीठ नाट्यशास्त्र विभाग व गायन समाज देवल क्लब यांच्यावतीने २२ ते २४ सप्टेंबर या कालावधीत विद्यापीठातील भाषा भवन येथे ही स्पर्धा झाली.

कोल्हापुरातील भारती विद्यापीठाच्या 'भोंडला' ही एकांकिका सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ठरली. 'शिकवण' या एकांकिकेतील गवत्या या भूमिकेसाठी चैतन्य जवळगेकर याला उत्कृष्ट अभिनेता हा म्हणून गौरवण्यात आले. 'एक्स्पायरी डेट' या एकांकिकेतील भूमिकेसाठी प्रणाली पाटील हिला उत्कृष्ट अभिनेत्री म्हणून गौरवण्यात आले. सर्वोत्कृष्ट लेखकाचे पारितोषिक 'तिलांजली' या एकांकिकेसाठी सुदर्शन खोत याला मिळाले.